डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक.

वर्ष ६ वे, अंक १९ वा
मार्च २०१७

# जिव्हाळा

एक स्नेहबंध...




## सेवा संकल्प विशेषांक

# क्षण आनंदाचे...




बेरवळ येथील सेवा संकल्प समितीच्या आरोग्य तपासणी शिबिरात बोलताना आदिवासी विकास मंत्री मा. नामदार विष्णूजी सावरा



बेरवळ येथील सेवा संकल्प समितीच्या आरोग्य तपासणी शिबिरात बोलताना खासदार मा. हरिश्चंद्र चव्हाण



बेरवळ येथील आरोग्य तपासणी शिबिरात रुग्ण तपासतांना रुग्णालयाचे डॉ. पंकज भट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित
**श्रीगुरुजी रुग्णालय**
आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड,
नाशिक - ४२२ ००५.
दूरध्वनी : २३४२४०१, २३४३४०१
मो.: ८३८००११२८६
www.shrigurujirugnalaya.com
**जिव्हाळा** - त्रैमासिक
वर्ष ६ वे, अंक १९ वा, मार्च २०१७
- **मार्गदर्शक**
डॉ. विनायक गोविलकर
- **संपादक**
श्री. रविंद्र बेडेकर (८३८००११२८४)
ravibedekar@yahoo.om
- **मुद्रक/प्रकाशक**
श्री. प्रविण बुरकुले
(९८२२०४७४११११)
कार्यवाह, श्रीगुरुजी रुग्णालय
- **संपादक मंडळ**
श्री. प्रकाश भिडे
श्री. श्रीराम महाजन
डॉ. गिरीश बेद्रे
डॉ. अभिजित मुकादम
मोबाईल : ८३८००११२७८
. abhizone3@gmail.com
- **अक्षरजुळणी, सजावट व मुद्रक**
विकास प्रिंटिंग अॅण्ड कॅरीअर्स प्रा. लि.
सातपूर, नाशिक - ७
फोन - (०२५३) २३५१०१०

**द्वैवार्षिक वर्गणी - रू. १००/-**
**त्रैवार्षिक वर्गणी - रू. १५०/-**
**या अंकाचे देणगी मूल्य - रू. २०/-**

# संपादकीय

मार्च २०१७ चा जिव्हाळा आपल्या हातात देताना आम्हाला आनंद होत आहे. रुग्णालयाच्या कामकाज वाढीमुळे रुग्णांना अधिक सुविधा देण्याचाही सतत प्रयत्न असतो.

रुग्णालयातील डॉक्टर्स कायम आधुनिक सेवेबरोबर आपल्याला Update करत असतात. तसा त्यांचा प्रयत्न असतो. नुकतेच डॉ. धनंजय देशमुख हुबळी-कर्नाटक, डॉ. गिरीष बेद्रे जर्मनीला व डॉ. अभिजित मुकादम मुंबईला ट्रेनिंगसाठी जाऊन आले.

डॉ. मोरेश्वर राठोड हे आपल्या ग्रामीण भागात व सेवावस्तीमध्ये चालणाऱ्या रुग्णसेवेसाठी नव्याने आले आहेत. 'सेवा संकल्प समिती' या नावाने या सर्व विभागात नियमित कार्य चालू आहे. त्यावर स्वतंत्र लेख या अंकात आपणाला वाचायला मिळेल. ८ जानेवारी २०१७ रोजी बेरवळ गावात मोठा मेडिकल कॅम्प झाला त्याचाही अहवाल या अंकात आहे.

याशिवाय रुग्णालयात B.S.S. कॉलेज नव्याने १ फेब्रुवारी २०१७ पासून सुरू झाले आहे. नवोदित विद्यार्थी / विद्यार्थिनींना विविध प्रकारच्या सेवांचे प्रशिक्षण देण्याचे असे वर्षभराचे कोर्स चालू केले आहेत. त्यावरही स्वतंत्र लेख अंकात आहे. डॉ. अमोल कदम, डॉ. जयेश ढाके विशेष लक्ष घालत आहेत.

रुग्णांची OPD संख्या वाढत असल्यामुळे नव्याने Waiting Area हा वाढवण्यात आला आहे. रुग्णालयात रुग्ण व त्यांचे नातेवाईक संख्या वाढत आहे. त्यामुळे त्यांची खास व्यवस्था उत्तम करावी म्हणून नव्याने कॅन्टीन सुरू करण्यात आले आहे.

रुग्णालयाचे कामकाज दिवसेंदिवस वाढत आहे. सर्व डॉक्टर हे घड्याळ बघून कधीच काम करत नाही. अशावेळी त्यांच्या बच्चा-कंपनीची व्यवस्था लावली तर उत्तम सेवा देऊ शकतील, असा विचार करून रुग्णालयात एक 'पाळणाघर' सुरू करण्यात आले आहे.

**- रवींद्र अनंत बेडेकर**

सेवा संकल्प समिती
श्रीगुरुजी रुग्णालयाचा एक सामाजिक उपक्रम

# श्रीगुरुजी रुग्णालय – सेवा संकल्प समिती

**श्री. प्रवीण बुरकुले**
कार्यवाह

नाशिकमध्ये श्रीगुरुजी रुग्णालय सुरू होऊन जवळपास ९ वर्षे पूर्ण होत आहेत. आपले रुग्णालय संपूर्णपणे सेवाभावी तत्वावर चालवले जाते. सर्वसामान्य माणसाला अत्युच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा परवडेल अशा योग्य किमतीत देणे हा श्रीगुरुजी रुग्णालयाचा मुख्य उद्देश आहे.

सुरुवातीच्या काळात नवीन इमारत बांधून त्यातील प्रत्येक विभाग सर्व दृष्टीने सुसज्ज करून संपूर्ण रुग्णालयाच्या कामांमध्ये एकवाक्यता आणणे आवश्यक होते. असे असल्याने वनवासी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुग्णसेवा पुरविणे शक्य होत नव्हते. परंतु हे काम वाढविण्यासाठी वर्षभर प्रयत्न सुरू होते. संघ प्रेरणेने काम करणाऱ्या काही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर मे २०१६ पासून विविध प्रकारच्या बैठकाही सुरू होत्या. त्या दृष्टीने नाशिक शहरातील काही सेवा वस्त्या व जिल्ह्यातील वनवासी क्षेत्रात सर्वेक्षण केले गेले.

त्यानुसार श्रीगुरुजी रुग्णालयामार्फत वनवासी क्षेत्रात ७५ मोफत तपासणी शिबिरं, सेवा वस्तीत ७३ व नाशिक शहरात अन्य ५२ ठिकाणी मोफत तपासणी शिबिरं; रोटरी क्लबच्या मदतीने १७५ च्या वर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व रुग्णालयाच्या नेत्रज्योती संवर्धन योजनेतर्गत ५५ साधारणपणे सवलतीच्या दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यापूर्वी कातकरी समाज सर्वेक्षण अशा माध्यमातूनही काम झाले व यामार्फत जवळपास ४५ हजार ग्रामीण व वनवासी रुग्णांपर्यंतसुद्धा आपण पोहचलो होतो. जून २०१६ मध्ये रुग्णालयाच्या डायलेसीस युनिटच्या विस्तारीकरणाच्या वेळी वनवासी कल्याण आश्रमाचे आरोग्य रक्षक व टाकल विद्यालयाचे आचार्य यांना श्रीगुरुजी रुग्णालयात निमंत्रित केले होते. वनवासी क्षेत्रातील सुमारे १८० कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांना मार्गदर्शन म्हणून प्रथमोपचाराच्या संदर्भात प्रबोधनात्मक सत्र आपण घेतले होते.

या कार्यक्रमाचे फलित म्हणजे पेठ तालुक्यातील करंजखेड या गावात गॅस्ट्रोची साथ आली असताना तेथील एकल विद्यालयाचा आचार्य कैलास राऊत याने श्रीगुरुजी रुग्णालयाशी संपर्क साधून गॅस्ट्रो झालेल्या गावकऱ्यांवर उपचार करता येतील का? अशी विचारणा केली. त्याला प्रतिसाद म्हणून रुग्णालयाने रात्रीतून निर्णय घेऊन डॉक्टर्स, सिस्टर, फार्मासिस्ट एम. एस. डब्ल्यू. व सेवाव्रती यांची एक टीम करंजखेडला पाठवली. ४५० लोकवस्ती असलेल्या या गावात २२५ रुग्णांवर उपचार करून त्यांना बरे केले गेले. अशा भागामध्ये प्रत्यक्ष रुग्णसेवेचे काम सुरू करण्याची निकड प्रकर्षाने जाणवली.

दरम्यानच्या काळात नाशिक शहरातील दोन सेवावस्त्या व दोन वनवासी क्षेत्रात काम करण्याचे ठरले व ती ठिकाणं निश्चीत झाली. नाशिक शहरातील सेवावस्ती : १) आम्रपाली, कॅनॉल रोड– उपनगर, नाशिक रोड. २) प्रबुद्धनगर, सातपूर

वनवासी क्षेत्रातील : १) करंजखेड परिसर, ता. पेठ. २) कोटंबी परिसर, ता. त्र्यंबकेश्वर

प्रकल्पाची स्थाननिश्चिती झाली. या प्रकल्पांसाठी योग्य डॉक्टरांची आवश्यकता होती. ग्रामीण क्षेत्रात काम करण्याची आवड असणारे व सर्वांमध्ये मिळून मिसळून काम करून घेणारे डॉक्टर आवश्यक होते. डॉ. मोरेश्वर राठोड यांच्या रुपाने असे डॉक्टर आम्हाला मिळाले.

पुढील क्षेत्रांमध्ये काम करण्याचे निश्चित झाले.

१) आरोग्य २) पाणी– पिण्याचे शुद्ध पाणी व शेतीसाठी पुरेसे पाणी ३) महिला व बाल आरोग्य ४)

शिक्षण ५) महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण ६) शाश्वत सेंद्रिय शेती ७) स्वयंरोजगार ८) शासकीय योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी मध्यस्त म्हणून काम करणे.

कामाची सुरुवात : १ ऑक्टोबर २०१६ रोजी या प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरुवात झाली.

यामध्ये दरदिवशी ३ तास आरोग्य तपासणी व ३ तास विविध प्रकारचे सर्वेक्षण केले जाते. आतापर्यंत ३ महिन्यांत ४५०० रुग्णांची तपासणी होऊन आजाराप्रमाणे वर्गवारीही करण्यात आली आहे.

इतर विविध सर्वेक्षणे :

१) जनरल सर्व्हे : परिसराचा व सेवावस्तीचा जनरल सर्व्हे यात वस्तीतील कुटुंब संस्था, त्यांना असलेल्या सोयी-सुविधा, आरोग्य सुविधा याची माहिती गोळा केली जाते.

२) पाणी : पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (पाण्याची शुद्धता बघणे) तसेच शेतीसाठी किती पाणी उपलब्ध आहे हे पाहणे.

३) अंगणवाडी व शालेय मुलांचा सर्व्हे : यात मुलांचे कुपोषणाचे प्रमाण, इतर आजार व मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा यासंदर्भातील माहिती घेतली जाते.

४) युवकांचा सर्व्हे : रोजगारासंदर्भातील माहिती घेणे.

५) महिला सर्व्हे : बचतगटांची माहिती घेणे.

पाणी सर्वेक्षणात १२ पाड्यांतील पाण्याची तपासणी करण्यात आली. केवळ २ ठिकाणचे पाणी पिण्यालायक आहे असे लक्षात आले. इतर ठिकाणीही पाणीशुद्धीकरण योजना राबवणे गरजेचे आहे, असे समजले.

महिला बचतगट सुप्त स्वरूपात आहे. योग्य कामांसाठी मार्गदर्शन सुरू झाले आहे. करंजखेड, कोटंबी परिसरातील महिलांसाठी तांदूळ पॅकेजिंग युनिट प्रायोगिक स्वरूपात चालू केले आहे. यावर्षी २ हजार किलो तांदूळ पॅकिंग करून त्याची विक्री सुरू झाली आहे.

नाशिक रोडच्या आम्रपाली सेवावस्तीत टाकाऊतून टिकावू वस्तू बनविण्यासंदर्भात काम सुरू झाले आहे.

**उद्घाटन सोहळा बेरवळ, ता. त्र्यंबकेश्वर**

बेरवळ येथे आरोग्य शिबिर घेण्याचे ठरले. त्यानुसार एक महिना आधीपासून नियोजन केले गेले व त्यानुसार शिबिराची सर्व तयारी केली गेली.

कार्यक्रमप्रसंगी आदिवासी विकासमंत्री मा. श्री. विष्णू सावरा, खासदार हरिश्चंद्र चव्हाण, स्वामी श्री. कंठानंदजी, डॉ. भरत केळकर, संजयजी कुलकर्णी उपस्थित होते. उद्घाटनसोहळ्यानंतर भव्य अशा आरोग्य शिबिराची सुरुवात झाली. यामध्ये श्रीगुरुजी रुग्णालयाचे ३८ तज्ञ डॉक्टर्स व बाहेरील १२ डॉक्टर्सनी विविध प्रकारच्या रुग्णांची तपासणी केली.

एकंदर १७५२ रुग्णांची तपासणी झाली. त्यातील १८१ रुग्णांना पुढील उपचारासाठी श्रीगुरुजी रुग्णालयात बोलावले गेले आहे. त्यांना रुग्णालयात लागणारे उपचार मोफत दिले जातील. त्यापैकी ४५ जणांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. ५ जण विविध आजारांमुळे ॲडमिट आहेत. ५ जणांवर वेगवेगळ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

या शिबिरासाठी एकंदर ३५०० लोकांची उपस्थिती होती व सर्वांना भोजनासाठी खिचडीचे प्रयोजन केले होते.

या शिबिरासाठी बेरवळ गावातील ग्रामस्थ, संत गाडगे महाराज आश्रमशाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.


आगामी योजना : १) आरोग्य २) पाणी ३) स्वयंरोजगार ४) शिक्षण ५) महिला सबलीकरण

या सर्व पाचही विषयांचे प्रशिक्षण केंद्र सुरू व्हावे तसेच यासाठी जागा मिळावी म्हणून प्रयत्न सुरू झाले आहेत. दोन ठिकाणी शेतीत सुधारणा तसेच शक्यतो सेंद्रिय शेतीचा प्रचार चालू आहे. त्यासाठी ग्रामस्थांचा अतिशय सकारात्मक प्रतिसाद आहे. या सर्व विषयांसाठी मार्गदर्शक समिती बनवून या संदर्भातील काम पुढे जावे यासाठी योग्य व्यक्ती या समितीला जोडणे ही प्रक्रिया चालू आहे.

# दंत वैद्यकशास्त्र (Dentistry) म्हणजे काय?


– डॉ. सौ. गौरी पाटील
दंतरोग तज्ञ

वैद्यकीय व्यवसायातील अशी एक शाखा, जी तोंडाचा आतील भाग, पेशी, दात व त्यात उद्भवणाऱ्या रोग, विकार यांचा अभ्यास करते, व चिकित्सा किंवा निदान तसेच उपचार करते– एकूण त्याचे आरोग्य अबाधित राखते – ती शाखा म्हणजे दंत वैद्यक. अनेकदा पेशंट मला विचारतात की आमच्या रोगाचं मुळ कारण काय? दातातल्या कॅव्हिटीज अटळच आहेत का? हिरड्यांचे रोग मी टाळू शकेन की ते अनुवांशिक आहेत?



मौखिक आरोग्य हे पूर्णतः तुम्ही त्याची काळजी कशी व किती घेता यावर अवलंबून आहे! मूल मोठं व्हायला लागलं, त्याला दात आले की ब्रश वापरायला त्याला शिकवायला हवं.

लहान मुलाला मांडीवर घेऊन बसायचं आणि बोटाने किंवा स्वच्छ मऊ कापडाने, फार जोर न लावता हिरड्यांना मालिश केल्याप्रमाणे स्वच्छ करायचं, ही या बाबतीतली छान सुरुवात म्हणता येईल. काही अति उत्साही पालक स्वच्छतेच्या अतिरेकी कल्पना घेऊन जोरजोराने ब्रशचा वापर करतात. पण त्यामुळे अपायच अधिक होण्याची शक्यता असते!




काही साध्या सोप्या सवयी स्वतःला लावून घेतल्या तर मौखिक आरोग्य सांभाळणं कठीण नाही–

- प्रत्येक खाण्यानंतर पिण्याच्या पाण्याने खळखळून चूल भरणे
- योग्य आहार, नियमित ब्रशचा वापर आणि रात्री नायलॉनच्या दोऱ्याने दात साफ करणे.
- हिरड्या व दात यांच्या सीमारेषेवर ४५ अंशात टूथब्रश धरा आणि मनगटाची हालचाल करून प्रत्येक दाताची प्रत्येक बाजू घासली जाईल असे पहा. सर्व कान्या कोपऱ्यात ब्रश पोहोचेल व किमान ३-४ वेळा घर्षण होईल याची काळजी घ्या.
- दातांचे निरिक्षण करा व कुठेही काळा डाग दिसला तर दुर्लक्ष न करता डेंटिस्टला दाखवा.
- वेदना होण्याची

वाट पाहू नका. वेदना ही शेवटची पायरी असते हे लक्षात घ्या.

- सगळ्याच पेशंटसाठी सारख्याच आकाराची उपकरणे वापरात येत नाहीत. डेण्टिस्ट उचित तंत्रज्ञानाचा वापर करत आहे याची खात्री करून घ्या.
- कॅव्हिटीज कडे दीर्घ काळ दुर्लक्ष केल्याने तीव्र वेदना होऊ लागल्या तर वेदनाशामक गोळी घ्या व बर्फाने त्या जागेला शेक द्या.
- व्हिक्स, बाम किंवा टूथपेस्ट लावण्याचे टाळा, गरम शेक देणे टाळा.


थोडक्यात सांगायचं तर, आज १०० रुपये वाचविण्यासाठी तुम्ही डेंटिस्टकडे जाणे टाळाल तर उद्या कॅव्हिटीजच्या उपचारासाठी ५०० खर्च होतील.

मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग यांचं दंतरोगाशी जवळचं नातं आहे. मधुमेही लोकांना हिरड्यांचे रोग होऊ शकतात व ते बरे व्हायला खूप वेळ लागतो. हिरड्यामधील जंतू-संसर्ग रोखल्याने रक्तातील साखर वाढविणारे बॅक्टरीया नियंत्रणाखाली येतात व पर्यायाने मधुमेहही मर्यादेत राहतो. मधुमेहींनी खालील गोष्टी अवश्य कराव्यात–

- सहा महिन्यातून एकदा दंत सफाई–डेंटल क्लीन–अप.
- शक्यतो डेंटिस्टला सकाळच्या वेळात भेटा.
- डेंटिस्टकडे जाण्यापूर्वी खाऊन जाणे.
- शस्त्रक्रिया करायची असली तर औषध व अँटीबायोटिक घ्यायलाच हवं

हृदयरोगी साधारणपणे रक्त पातळ करण्याची औषधे घेत असतात. दात काढायचे असतील किंवा एखादे ऑपरेशन करायचे असेल तर ३ दिवस अगोदर ही औषधे थांबवावीत. अर्थात हे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करावे.

काही जणांना डेंटिस्टकडे जाण्याची भीती वाटते, पण डेंटिस्ट हे तुमच्या समस्या सोडवून तुम्हाला छान दात दाखवून हसता यावं याच प्रयत्नात असतात!



# विशेष घडामोडी

* इंडियन सिक्युरिटी प्रेस, करन्सी नोट प्रेस, सेंट्रल रिझर्व्ह पोलिस, नाशिक रोड यांचे सुरक्षा रक्षक तसेच कामगार विमा योजनेंतर्गत नाशिकमधील सर्व कंपन्यांचे कामगार या सर्वांच्या कॅन्सर रोग निदान व उपचाराकरिता त्यांना श्रीगुरुजी रुग्णालयाशी संलग्न करण्यात आले आहे.
* दि. २६ जानेवारी २०१७ प्रजासत्ताकदिनाच्या शुभदिनी श्रीगुरुजी रुग्णालय संचलित बीएसएस कम्युनिटी कॉलेजच्या वतीने रुग्णालयात खालीलप्रमाणे पॅरामेडिकल कोर्सेस सुरू करण्यात आले.

१) सर्टिफिकेट इन डायलेसिस टेक्निशियन, कालावधी - १ वर्ष, शैक्षणिक पात्रता : ANM/GNM/Bsc Nursing, BAMS, BHMS

२) एक्स-रे टेक्निशियन, कालावधी - १ वर्ष, शैक्षणिक पात्रता : १० वी पास/नापास

३) ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, कालावधी - १ वर्ष, शैक्षणिक पात्रता : १२ वी पास/नापास

४) पेशंट अस्टिटंट, कालावधी - १ वर्ष, शैक्षणिक पात्रता : १० वी पास/नापास

पॅरामेडिकल शिक्षण देणारे हे पहिले व एकमेव कम्युनिटी कॉलेज असून, इच्छुकांनी याचा जरूर लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

* दि. १४ एप्रिल २०१६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली. आनंदवल्ली येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. कडलग हे प्रमुख पाहुणे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भोसला भागाचे प्रचारक श्री. सुमेधजी देशमुख हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांची समाजभक्ती व देशभक्ती प्रकट करणाऱ्या त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. रुग्णालयाचे सहकार्यवाह डॉ. गिरीश चाकूरकर यांनी प्रमुख पाहुणे व वक्त्यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख श्री. दिलीपराव क्षिरसागर, विभाग कार्यवाह श्री. संजय कुलकर्णी, श्रीगुरुजी रुग्णालय समितीचे उपाध्यक्ष श्री. मुकुंद खाडीलकर, कार्यवाह श्री. प्रविण बुरकुले, 'जिव्हाळा'चे संपादक श्री. रविंद्र बेडेकर तसेच रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, कर्मचारी, सेवाव्रती व हितचिंतक उपस्थित होते.

# रुग्णसेवेत एक पाऊल पुढे

## श्रीगुरुजी रुग्णालय समिती संचलित

## BSS Community College

``Social Movement in Healthcare" असे स्वप्न उराशी बाळगून सुरू झालेल्या श्रीगुरुजी रुग्णालयाने गेल्या ८ वर्षांत केवळ नाशिकच नव्हे तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील वैद्यकीय सेवाक्षेत्रात आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. ''वाजवी दरात उत्कृष्ट वैद्यकीय सेवा'' असा ध्यास घेतलेल्या व ''सामान्य माणूस'' हाच आपल्या सेवेचा केंद्रबिंदू जपणाऱ्या श्रीगुरुजी रुग्णालयाने आता त्याच ध्येयपूर्तीसाठी नाशिकमधील पहिले व एकमेव BSS Community College सुरू करून Paramedical शिक्षणक्षेत्रात पाऊल टाकले आहे.

BSS Community College हे BSS म्हणजेच भारत सेवक समाज या संस्थेशी संलग्न आहे. BSS ही भारत सरकार पुरस्कृत संस्था असून, या संस्थेची स्थापना सन १९५२ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरू आणि श्रम व रोजगारमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी भारत सरकारच्या पहिल्या नियामक आयोगाच्या बैठकीत केली. 'या संस्थेच्या संविधानाला व कार्यप्रणालीला भारतीय संसदेने एकमताने मान्यता दिलेली आहे. या संस्थेच्या प्रमाणपत्रांना संपूर्ण भारतात मान्यता आहे. विशेष म्हणजे या संस्थेच्या अभ्यासक्रमासाठी वय, शैक्षणिक पात्रता, भाषा इ. बद्दलचे निकष तुलनेने अत्यंत सोपे आहेत. सदर अभ्यासक्रम वर्षातून दोन वेळा (जानेवारी ते डिसेंबर आणि जून ते मे) अशा शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यात येतात. BSS तर्फे २६ वेगवेगळ्या प्रकारच्या Schools च्या अंतर्गत जवळपास दीड हजारांहून अधिक कौशल्य विकास अभ्यासक्रम चालविले जातात. (उदा. आरोग्यविज्ञान, शेती व पूरक व्यवसाय, आयुर्वेद, संगणक शिक्षण, व्यवस्थापन इ.)

दिवसेंदिवस वाढत असलेले वैद्यकीय सेवांचे दर, सतत भासणारी कुशल मनुष्यबळाची गरज व त्या तुलनेने होणारा तुटपुंजा पुरवठा इ. समस्यांवर उपाय म्हणजे Paramedical सारखे अल्पकालीन Courses करून हीच पिढी व्यवसायाभिमुख शिक्षण घेऊन स्वयंरोजगाराच्या उत्तम संधी स्वतः निर्माण करू शकते व आपले उज्ज्वल भविष्य घडवू शकते.

जे पूर्वीपासून या वैद्यकीय क्षेत्रात काम करतात, त्यांना शास्त्रीय पद्धतीने शिक्षण देणे आणि जे वैद्यकीय क्षेत्रात काम करू इच्छितात त्यांचा शास्त्रीय पद्धतीने कौशल्यविकास करणे हेच असे अभ्यासक्रम चालू करण्यामागचे आपले उद्दिष्ट आहे. श्रीगुरुजी रुग्णालय समिती संचलित BSS Community College ने खालील Courses सुरू केले आहेत.

१. ऑपरेशन थिएटर टेक्निशियन

२. एक्स-रे टेक्निशियन

३. सर्टिफिकेट इन डायलिसिस टेक्निशियन

४. पेशंट असिस्टंट

हे सर्व Courses केवळ १ वर्ष कालावधीचे असून, इथे Thery बरोबरच Practical Training सुद्धा एकाच ठिकाणी देण्यात येणार आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी परिपूर्ण व अत्याधुनिक शिक्षण घेऊन आत्मविश्वासाने उत्कृष्ट दर्जाची सेवा देऊ शकतील. सरकारी दवाखाने, Dialysis Centers, Radiology

Centers अशा अनेक ठिकाणी नोकरीच्या संधी त्यांना उपलब्ध होतील, तसेच खासगी रुग्णसेवा व Homecare Nursing Centers इ. अनेक स्वयंरोजगाराच्या संधीही त्यांना मिळतील.

पुढील काळात वैद्यकीय क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रांतही कौशल्यविकास अभ्यासक्रम चालू करण्याचा आमचा मानस आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ८३८००११८०५


# सुविधा

## डायलीसीस सेंटरचे विस्तारीकरण

दि. १२ जून २०१६ रोजी आपल्या श्रीगुरुजी रुग्णालयात डायलीसीस सेंटरचे विस्तारीकरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. रुग्णालयात दोन डायलीसीस मशिन्स उपलब्ध होत्या. वाढती गरज लक्षात घेऊन ब्लू क्रॉस कंपनीच्या सहकार्याने आणखी तीन मशिन्स उपलब्ध झाल्या आहेत.

या निमित्त भोसला कॉलेजच्या सभागृहात वनवासी तरुणांसाठी 'प्रथमोपचार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वनवासी कल्याण आश्रमाचे 'आरोग्यरक्षक' आणि एकल विद्यालयाचे 'आचार्य' यांना विशेष निमंत्रित केले होते. पेठ, सुरगाणा, हरसूल, त्र्यंबक, इगतपुरी, दिंडोरी आणि कळवण या वनवासी परिसरातून आलेल्या १७५ आरोग्यरक्षकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. त्यात महिलांचा सहभागही चांगला होता. त्या सर्वांना रुग्णालयातर्फे मोफत 'आरोग्य कीटस्'चे वाटप करण्यात आले. डॉ. राजेंद्र खैरे आणि डॉ. सचिन देवरे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. इसरानी उपस्थित होते.





# नवजात बालकांची श्रवण-क्षमता तपासणी

- डॉ. पंकज भट
कान-नाक-घसा विकार तज्ञ

मानवी शरीरातील पाच ज्ञानेंद्रियांपैकी अतिशय महत्वाचे पण तरीही दुर्लक्षित इंद्रिय म्हणजे कान. श्रवण क्षमता ही बहुशः गृहीतच धरली जाते!

दर हजारी दोन ते तीन मुले जन्मतःच श्रवण अक्षम (बहिरी) असतात. असे असूनही त्यांच्यातली ही त्रुटी लक्षात यायला सरासरी तब्बल अठरा महिन्यांचा काळ निघून जातो. वस्तुतः हाच सुरुवातीचा काळ बालकाची वाणी व भाषा विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असतो. या दोन गोष्टींच्या विकासाचा व बालकाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासाशीही किती जवळचा संबंध आहे हे आपण जाणतोच! त्यामुळेच या क्षेत्रातील वैद्यकीय व्यक्ती व संस्था श्रवण अक्षमतेचे निदान जन्म नंतर शक्य तितके लवकर व्हावे, या बाबत आग्रही व सजग असतात. निदान लवकर झाले व या अक्षमतेवरील उपाय योजना त्वरित सुरु झाली तर अतिशय सकारात्मक फरक अशा बालकांमध्ये पडतो आणि आयुष्यात या कमतरतेमुळे मागे पडण्याची व न्यूनगंड येण्याची शक्यता लक्षणीय रित्या कमी होते.

तंत्रज्ञानातील विकासामुळे आता नवजात बालकांमधील श्रवण क्षमतेचे परीक्षण करणे शक्य झाले आहे. अशा चाचण्यांमधील OAE व ABR या तपासण्या सध्या योग्य मानली जाते.



OAE म्हणजे Oso Accoustic Emission व ABR म्हणजे Auditory Brainstem Response.

OAE या चाचणीसाठी एक छोटे यंत्र वापरले जाते, ज्यात एका प्रोबमार्फत ध्वनी लहरी कानापर्यंत पोहोचविल्या जातात व श्रवण क्षमतेचे परीक्षण केले जाते. ही चाचणी अतिशय उपयुक्त आहे कारण ती अगदी प्रसूतीनंतर लगेचच करता येऊ शकते. ABR ही चाचणी त्या मानाने गुंतागुंतीची आहे. ती थोडीफार ECG सारखी असते. डोक्यावरील ठराविक ठिकाणी त्यासाठी इलेक्ट्रोड लावले जातात व कानामध्ये ध्वनीच्या साहाय्याने उत्तेजना देऊन त्यातून येणाऱ्या सूक्ष्म विद्युत लहरी नोंदवल्या जातात- रेखांकित केल्या जातात. मात्र ही चाचणी OAE चाचणीत अक्षमता लक्षात आल्यास केली जाते.

एकूण काय, प्रसूतिगृहातून बाहेर पाठवण्याआधी प्रत्येक बालकाची श्रवण क्षमता चाचणी करणे निश्चितच उपयुक्त आहे. युरोप, अमेरिकेसारख्या प्रगत देशात ही चाचणी बंधनकारक आहे. भारतातही बहिरेपणाची समस्या नियंत्रित करण्यासाठी NPPCD म्हणजे National Programme for Prevention and Control of Deafness या नावाने काम चालते. मात्र सध्या आपल्या देशात कमी दिवसांची प्रसूती, प्रसूतीच्या वेळी किंवा प्रसूतीनंतर अल्प

कालावधीत होणारी कावीळ वगैरे गोष्टी उद्भवल्या तर या चाचण्या केल्या जातात. हे उपयुक्त आहेच, परंतु यातून सर्वच अक्षम बालकांचे निदान होईल असे नाही. सार्वत्रिक चाचणी हाच यावर खरा उपाय आहे.

सर्वसामान्य नागरिकांनीही याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. योग्य वेळी निदान व उपाययोजना हे अनेक रोग, विकार व समस्या यावर मात करण्याचे हुकमी तंत्र आहे. योग्य वेळी काळजी घेतल्याने एखाद्या बालकाच्या जीवनात कमालीची सुधारणा होऊ शकते.


## सेवाकार्य – सहेली सेवा मंडळ

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या नात्याने सहेली सेवा मंडळातर्फे आपल्या रुग्णालयात सर्वसाधारण विभागातील रुग्णांना व त्यासोबत असणाऱ्या व्यक्तीस सवलतीच्या दरात म्हणजे १० रुपयांत जेवण उपलब्ध करून दिले जाते.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना उपचारासाठी लागणारी आर्थिक मदत दिली जाते. त्याचबरोबर औषधांसाठी किंवा उपचारादरम्यान होणाऱ्या खर्चासाठी काही प्रमाणात आर्थिक मदत दिली जाते.

श्रीगुरुजी रुग्णालयात घेण्यात येणाऱ्या शिबिरामध्ये उपचार घेणाऱ्या व्यक्तींना अल्पोपहार, चहा, शुद्ध पाण्याची व्यवस्था केली जाते. बाहेरगावी आदिवासी भागात घेण्यात येणाऱ्या शिबिरामध्ये, रुग्णालयात घेण्यात येणाऱ्या शिबिरामध्ये, त्याचबरोबर झोपडपट्टी भागातील शिबिरातसुद्धा रुग्णांसाठी अल्पोपहार, चहा, पाणी याची व्यवस्था आपले सहेली ग्रुप करीत असते.

या सर्व उपक्रमासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद सहेली सेवा मंडळाच्या प्रत्येक सदस्याकडून वर्गणीरूपाने मिळत असते.




## ❑ परिचय ❑
## नवीन पूर्णवेळ डॉक्टर्स




**डॉ. गौरी राहुल पाटील** (दंतरोग तज्ञ)

ह्यांनी दि. २९ मार्च २०१६ पासून आपल्या रुग्णालयात रुग्णसेवा प्रारंभ केली आहे. त्यांनी के.एल.इ. दंत महाविद्यालय, बेळगाव येथून बी.डी.एस.(B.D.S.) तसेच के.एल.ई. विद्यापीठातून Certified Cosultic Dentistry कोर्स पूर्ण केला आहे. त्यांनी के.एल.इ. दंतमहाविद्यालय सहा वर्षे काम केले आहे. गेली दहा वर्षापासून त्या वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत.




**डॉ. जयेश चंद्रकांत ढाके** (अस्थिरोग तज्ज्ञ)

ह्यांनी दि. १ जुलै २०१६ पासून रुग्णसेवेस प्रारंभ केला आहे. त्यांनी एम. आय एम. इ. आर. मेडिकल कॉलेज, तळेगाव (पुणे) येथून एम.बी.बी.एस. तसेच डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, कोल्हापूर येथून एम. एस. ऑर्थोपेडिक पूर्ण केले आहे. डॉ. जयेश ढाके यांनी संचेती हॉस्पिटल, पुणे व अपोलो हॉस्पिटल, नाशिक येथे कन्सल्टंट म्हणून काम पाहिले आहे. ते दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे आणि सनशाईन हॉस्पिटल हैदराबाद येथे फेलो (Fellow) तसेच एनडीएमव्हीपी मेडिकल कॉलेज, नाशिक येथे सहाय्यक प्रोफेसर होते. भारतातील नामवंत सर्जन्स बरोबर काम केले असल्याने डॉ. ढाके हे एक अनुभवसिद्ध निष्णात Joint Replacement Surgeon आहेत.



**डॉ. पंकज लक्ष्मीकांत भट** (कान-नाक-घसा तज्ज्ञ)

ह्यांनी दि. १६ सप्टेंबर २०१६ पासून आपल्या रुग्णालयात सेवेस प्रारंभ केला आहे. त्यांनी प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी येथून एम.बी.बी.एस., इंदिरा गांधी गर्व्हर्न्मेंट मेडिकल कॉलेज, नागपूर येथून डी.एल.ओ. तसेच दीनदयाळ उपाध्याय हॉस्पिटल, नवी दिल्ली येथून डी.एन.बी. (ईएनटी)चे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी पार्क हॉस्पिटल, नवी दिल्ली येथे ENT कन्सल्टंट म्हणून काम केले आहे.



**डॉ. मोरेश्वर सुभाष राठोड**

हे दि. १ ऑक्टोबर २०१६ पासून रुग्णालयाच्या सेवासंकल्प समितीचे पूर्णवेळ डॉक्टर म्हणून रुजू झाले आहेत. त्यांनी वसंत पवार मेडिकल कॉलेज, नाशिक येथून एम.बी.बी.एस. आणि नायर हॉस्पिटल, मुंबई येथून डी.सी.एच. पूर्ण केले आहे. विवेकानंद केंद्रातून प्रेरणा घेऊन त्यांनी सामाजिक सेवेचे व्रत घेतले आहे. कुपोषित बालकांचे आरोग्य, जलव्यवस्थापन, सेंद्रीय शेती इ. विषयांच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरू आहे. त्यासाठी दर आठवड्याला त्यांचा प्रवास नाशिक येथील दोन सेवावस्त्या, तसेच त्र्यंबक तालुक्यातील २६ पाडे व पेठ तालुक्यातील ८ पाडे या ठिकाणी होतो. वनवासी बांधवांच्या समस्या दूर करण्यात ते तत्पर आहेत.



# घडामोडी



## * वर्धापनदिन मेगा कॅम्प – २०१६

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीगुरुजी रुग्णालयाच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त दि. ३ मार्च ते ६ मार्च असे चार दिवस रुग्ण चिकित्सा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले. पहिले तीन दिवस रुग्णालयात व चौथ्या दिवशी वनवासी रुग्णांसाठी ठाणापाडा (ता. त्र्यंबकेश्वर) व मनखेड, ता. सुरगाणा येथे शिबिर संपन्न झाले.

दि. ३ मार्च रोजी सकाळी सात वाजता रुग्णालयातील स्वागत कक्षातील कर्मचारी श्री. राहुल कांबळे व कुटुंबीय यांचे शुभहस्ते धन्वंतरी पूजनाने महाशिबिराचा शुभारंभ करण्यात आला. दहा वाजेपासून रुग्ण तपासणी चालु झाली. नेत्ररोग २७८, स्त्रीरोग ४९, बालरोग १८ आणि आयुर्वेद १३ याप्रमाणे एकूण ३५८ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

दि. ४ मार्च रोजी दुसऱ्या दिवशी डॉ. सारंग इंगळे, ज्येष्ठ आयुर्वेद तज्ज्ञ यांनी शिबिराचे उद्घाटन केले. 'मनाची प्रसन्नता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे' असे सांगून त्यांनी या उपक्रमाबद्दल रुग्णालयाचे अभिनंदन केले. त्यानंतर नवीन पॅथॉलॉजी रूमचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. अस्थिरोग २१४, सर्जरी ४९, त्वचा ९५, आयुर्वेद १६ असे एकूण ३७४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

दि. ५ मार्च रोजी तिसऱ्या दिवशी श्री. आलोकजी झा यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. तसेच रुग्णालयात नवीन तयार केलेल्या स्ट्रेस टेस्ट रूमचे उद्घाटन श्री. अलोकजींनी केले. मेडिसीन १५७, कॅन्सर १७, स्पीच थेरपी २३, आयुर्वेद ६ आणि ऑक्युपेशनल थेरपी २० असे एकूण २३७ रुग्णांना तपासण्यात आले.

या तीन दिवसांत हिमोग्लोबीन ४९७, रक्त शर्करा प्रमाण २०१, हाडांचा ठिसूळपणा १५०, विशेष पॅथॉलॉजी पॅकेज ६१ रुग्णांनी महाशिबिराचा लाभ घेतला.

दि. ६ मार्च रोजी चौथ्या दिवशी ठाणापाडा (ता. त्र्यंबकेश्वर) आणि मनखेड (ता. सुरगाणा) येथे शिबिर झाले. या शिबिरासाठी रुग्णालयाचे सर्व डॉक्टरांबरोबरच आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी डॉक्टर्स, डॉ. पाटील, डॉ. सौ. ज्योती बडकस, डॉ. अभिजीत कुर्डुकर तसेच वणीहून डॉ. मधुकर आचार्य (मा. संघचालक मालेगाव), डॉ. सौ. अमिता आचार्य, डॉ. पांडुरंग राऊत, डॉ. सोहम चांडोले हे उपस्थित होते. मनखेड येथे ३५६ व ठाणापाडा येथे ३६६ रुग्णांनी तपासणी करून घेतली. दोन्ही ठिकाणच्या ज्या रुग्णांना आवश्यक त्या पुढील तपासण्या रुग्णालयात करण्यास सांगितल्या त्या सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आल्या. ठाणापाडा शिबिराची सर्व व्यवस्था एकल विद्यालयाच्या कार्यकर्त्यांनी सांभाळली तर मनखेड शिबिराची सर्व व्यवस्था वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांनी सांभाळली.

चार दिवस चाललेल्या या महाशिबिराचा १६६१ रुग्णांनी लाभ घेतला. हे महाशिबिर यशस्वी

करण्यासाठी रुग्णालयातील सर्व कर्मचारी सेवाव्रती, विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

* बॉश इंडिया नाशिकच्या सी. एस. आर. कार्यक्रमांतर्गत चालणाऱ्या चाईल्ड हेल्थ डेव्हलपमेंट प्रोग्राम नुसार फेब्रुवारी व मार्च महिन्यात दहा शाळांतील २१९० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच या सर्व शाळांमध्ये डॉ. विक्रांत मुंगी, डॉ. रामदास पवार आणि डॉ. योगेश भावे यांनी ''वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्य'' या विषयी व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.
* श्री. सुरेश सिसोदीया यांच्या सहयोगाने सुरू केलेल्या 'पॅप स्मिअर टेस्ट' (गर्भाशय- मुख कॅन्सर) कार्यक्रमात फेब्रुवारी व मार्च महिन्यात एकूण ११ शिबिरातून ४७५ पॅप स्पिअर टेस्ट करण्यात आल्या.
* राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत पुळेगाव (ता. त्र्यंबकेश्वर) येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. डॉ. सचिन देवरे व डॉ. रामदास पवार यांनी रुग्ण तपासणी केली. ५८ वनवासी रुग्णानी या शिबिराचा लाभ घेतला.
* डॉ. निखिल किबे, डिस्ट्रीक्ट गव्हर्नर, रोटरी इंटरनॅशनल यांनी श्रीगुरुजी रुग्णालयास भेट दिली. डॉ. हेडगेवार रुग्णालय (औरंगाबाद) चे डॉ. प्रसन्न पाटील यांनी श्रीगुरुजी रुग्णालयास भेट देऊन रुग्णालयाच्या विविध प्रकल्पासंबंधी मार्गदर्शन केले.
* **गर्भाशय मुख कॅन्सर तपासणी शिबिर**

  जून २०१६ मध्ये दिंडोरी तालुक्यात २४ शिबिरे झाली, ७८१ रुग्ण तपासण्यात आले. जुलै २०१६ मध्ये दिंडोरी व निफाड तालुक्यात १८ शिबिरे झाली. ५३९ रुग्ण तपासण्यात आले. ऑगस्ट २०१६ मध्ये निफाड तालुक्यात २० शिबिरे झाली, ५७७ रुग्ण तपासण्यात आले. सप्टेंबर २०१६ मध्ये निफाड तालुक्यात १६ शिबिरे झाली. ५२४ रुग्ण तपासण्यात आले. ऑक्टोबर २०१६ मध्ये पेठ तालुक्यात १८ शिबिरे झाली. ५५९ रुग्ण तपासण्यात आले. नोव्हें. २०१६ मध्ये पेठ व सुरगाणा तालुक्यांत २२ शिबिरे झाली. ४६३ रुग्ण तपासण्यात आले. डिसेंबर २०१६ मध्ये सुरगाणा तालुक्यात २७ शिबिरे झाली. ७७७ रुग्ण तपासण्यात आले. जानेवारी २०१७ मध्ये कळवण तालुक्यात १६ शिबिरे झाली. ५९५ रुग्ण तपासण्यात आले.
* **राजीव गांधी जीवनदायी योजना**

  राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत झालेल्या आरोग्य तपासणी शिबिरात २७ जुलै २०१६ ला करंजखेड येथे २०० रुग्ण, १२ सप्टेंबर २०१६ ला लखमापूर येथे १७६ रुग्ण, ऑक्टोबर २०१६ ला करंजखेड येथे १०८ रुग्ण व डहाळेवाडी येथे १३२ रुग्ण, नोव्हेंबर २०१६ ला अंबोडा, ता. सुरगाणा येथे १४० रुग्ण, खरशेत, ता. त्र्यंबक येथे २७० रुग्ण, डिसेंबर २०१६ ला बेरवळ, ता. त्र्यंबक येथे १२७ रुग्ण व गांडोळे, ता. दिंडोरी येथे १३० रुग्ण तपासण्यात आले. या सर्व शिबिरात डॉ. सचिन देवरे, डॉ. योगेश भावे, डॉ. विक्रांत मुंगी, डॉ. मोरेश्वर राठोड, डॉ. धनंजय देशमुख व डॉ. सुप्रिया देवरे यांनी रुग्णांची तपासणी केली.
* **सेवा वस्ती आरोग्य शिबिर**

  श्रीगुरुजी रुग्णालयाने आम्रपाली सेवावस्ती आणि शांतीनगर सेवावस्ती आरोग्य सेवा हेतुने दत्तक घेतलेल्या वस्ती आहेत. जून २०१६ मध्ये आम्रपाली सेवा वस्तीत शिबिर झाले. ३१६ रुग्ण तपासण्यात आले. १६ ऑगस्ट २०१६ आम्रपाली सेवावस्तीत ३१० तर ३१ ऑगस्ट २०१६ ला झालेल्या शिबिरात शांतीनगर सेवा वस्तीतील ३१८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सप्टेंबर २०१६ लायन्स क्लबच्या सहकार्याने आम्रपाली सेवावस्तीत झालेल्या शिबिरात १२८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. या सर्व शिबिरात डॉ. राजेंद्र खैरे, डॉ. योगेश भावे, डॉ. विक्रांत मुंगी, डॉ. अनुप्रिता कुलकर्णी, सौ. वैदेही मुंगी यांनी रुग्णांची तपासणी केली.

* **शालेय विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिर**

दि. १२ जुलै ते २६ जुलै २०१६ मध्ये बॉईज टाऊन पब्लिक स्कूल, नाशिक येथे २०४५ शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. दि. २८ जुलै रोजी के. के. वाघ सरस्वतीनगर येथे २१६ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. दि. २ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०१६ मध्ये झालेल्या विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिरात के. के. वाघ, चांदोरी १६८, के. के. वाघ पुरिया पाक४ १११ आणि के. के. वाघ सरस्वतीनगर ३१५ विद्यार्थी तसेच २१ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०१६ मध्ये के. के. वाघ ज्युनियर कॉलेज २६३ व के. के. वाघ गंगापूर रोड २५३ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या सर्व शिबिरात डॉ. विक्रांत मुंगी, सौ. वैदेही मुंगी आणि योगेश भावे यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली.

* **चाईल्ड हेल्थ डेव्हलपमेंट प्रोग्राम**

चाईल्ड हेल्थ डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या १२ शाळांमध्ये जुलै २०१६ व डिसेंबर २०१६ मध्ये आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. अनुक्रमे तीन हजार व ५०० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. डॉ. योगेश भावे, डॉ. विक्रांत मुंगी, श्रुती भट यांनी तपासणी केली.

* प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. ५ सप्टेंबर २०१६ रोजी श्री गणेश चतुर्थीनिमित्त रुग्णालयात श्री. मुकुंद खाडीलकर यांचे शुभहस्ते श्रींची प्रतिष्ठापना करण्यात येऊन श्री गणेशोत्सवास प्रारंभ झाला. रोज सकाळ-संध्याकाळी श्रींची आरती करण्यासाठी सर्वश्री वैद्य विक्रांत जाधव, सुमीत बजाज, इंजिनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री. वाणी सर, आरोग्य विद्यापीठाच्या सचिव विद्या ठाकरे, हिंदू एज्युकेशन सोसायटी (भोसला)चे सर्व संचालक, नाशिक महानगरपालिकेचे उपायुक्त श्री. डोरकुलकर, प्रसिद्ध सायकलपटू डॉ. हितेंद्र महाजन हे मान्यवर येऊन गेले. दि. १५ सप्टेंबर २०१६ रोजी श्रींचा विसर्जन सोहळा संपन्न झाला.
* रोटरी क्लब, नाशिक शाखेच्या वतीने रुग्णालयातील ओपीडी रुग्णांसमोर 'अवयवदानाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. तसेच रोटरी क्लब गोदावरी शाखेच्या वतीने रुग्णालयात रुबेला लसीकरण शिबिर (१३ वर्षांवरील युवतींसाठी) घेण्यात आले. त्याचा रुग्णालयातील सर्व परिचारिका व महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.
* दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिनी डॉ. आंबेडकरांच्या जीवन चरित्राचे अभ्यासक श्री. म्हसराळे यांनी रुग्णालयास भेट दिली.
* डॉ. जयश्री तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात Bariatric (स्थूलशरीर) शिबिर संपन्न झाले. ४० रुग्णांनी लाभ घेतला.
* दि. ३० डिसेंबर २०१६ रोजी सेवांकुरतर्फे विद्यार्थी डॉक्टरांसाठी विविध वैद्यकीय सेवा याविषयी मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. श्री. दिलीप क्षीरसागर, श्री. संजय साळवे आणि डॉ. अतुल कणीकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ३० विद्यार्थी डॉक्टर्स उपस्थित होते.
* दि. २६ जानेवारी २०१७ श्री. संतोष मंडलेचा, उद्योजक यांनी श्रीगुरुजी रुग्णालयास भेट दिली.

*सेवाधर्म है परम पुनीत...*

**आवाहन - 'सेवाव्रती व्हा!'**

सेवाव्रती हे रुग्णालयाच्या रोजच्या कामकाजातील आधार आहेत. सर्व निवृत्त व वयस्कर मंडळी ठरल्याप्रमाणे त्यांच्या वेळी येत असतात. आम्ही वाचकांना आवाहन करत आहोत की आपणही दिवसातील तीन तास अशा पद्धतीने सेवाव्रती म्हणून येऊन या रचनेला बळ द्यावे. यासाठी रुग्णालयातील खालील व्यक्तींना संपर्क साधावा.

**श्री. सतीश पाटील - ८३८००११९७७**

**डॉ. विक्रांत मुंगी - ८३८००११२८७**

# रुग्णानुभव

माझे वडील श्री. विनायक सुपेकर वय वर्षे ८४ यांना दि. २१/१/२०१७ रोजी सकाळी चक्कर येणे, डाव्या बाजूला हात उचलताना त्रास होणे, डावे पाऊल उचलताना झोक जाणे, तोंडाला विशेषतः जिभेला जडपणा, अडखळत बोलणे आदी त्रास होत होता. मी श्रीगुरुजी रुग्णालयाबाबत सर्वसाधारण ऐकून होतो. पण असे काही अचानकपणे झाल्यावर परिचितांनी वेगवेगळे दवाखाने सुचविण्यास सुरवात केली.

त्यात आपल्याकडील अकाऊंट सेक्शनमधील श्री. कुलकर्णी यांना फोन केला. त्यांनी मला सर्व सुविधा अत्यंत चांगल्या असून याच ठिकाणी दाखल करा असे सांगितले. तपासणीसाठी नेताना मनात प्रचंड धाकधूक होती. केसपेपर काढून सहाय्यक डॉक्टरांनी तपासणी केली. त्यांनी 'पॅरालिसीसचे' निदान केले. हे सर्व करत असताना त्यांनी पेशंट सकट आम्हा सर्वांना आपुलकीची सेवा दिली.

त्यानंतर त्यांनी आम्हाला सिटी स्कॅन, एमआरआय करावा लागेल असे सांगितले. माझ्या वडिलांना डॉ. पिळोदेकर यांनी लगेचच 'आयसीयू'मध्ये डायबीटीस, बीपी, ईसीजी आदी उपचारांच्या टेस्ट चालू केल्या. सीटी स्कॅन, एमआरआय यासाठी बाहेरुन सेवा घ्यावी लागते असे कळले. त्यासाठी रुग्णालयाने अत्यंत उत्तम सेवा ठेवली होती.

डॉ. पिळोदेकरांसह डॉ. सैनी, डॉ. पवार यांनी घरगुती वातावरणाप्रमाणे हसतखेळत सुविधा दिली. रुग्णालयात कोठेही घाई नाही, गडबड नाही, गोंधळ नाही, पेशंट-पेशंटस्चे नातेवाईक यांची ये-जा चालू होती. पण सर्वजण नेमून दिलेली कामे अत्यंत शिस्तीने पार पाडत होती. रुग्णालयात सर्वत्र स्वच्छता दिसून येत होती. कोठेही कचरा नाही- घाण नाही. सर्वत्र नीटनेटकेपणा व टापटीपपणा दिसून येत होता.

आयसीयूमधील ट्रिटमेंट संपल्यावर माझ्या वडिलांना स्पेशल रूममध्ये हलविण्यात आले. तेथे डॉ. सौ. कुलकर्णी या स्वतः लक्ष घालून पेशंटना देण्यात येणारी औषधे, इंजेक्शन, सलाईन देणे, मार्गदर्शन करत होत्या. त्यांनी पेशंटला वेळेवर उपचार देऊन अत्यंत आस्था दाखवली.


या रुग्णालयात असणारा स्टाफ, नर्सिंग वॉर्डबॉय (मामा) विशेषतः आनंद, बाबुराव, गवळी, विजय यांनी कुठलीही अपेक्षा न बाळगता वेळोवेळी प्रेमळ सेवा दिली. तसेच शिरसाठ/ त्रिभुवन मॅडम यांनी वेळोवेळी माझ्या वडिलांची चौकशी करून कायम दिलासा देत होत्या.

रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा! हे ब्रीदवाक्य येथे पदोपदी दिसून येते. डॉ. पिळोदेकर यांनी माझ्या वडिलांचें उपचार खूपच चांगले केले. त्यामुळे व येथील सर्व उत्तम सेवेमुळे माझे वडील या आजारातून पूर्णपणे बरे झाले.

श्रीगुरुजी रुग्णालयात अन्य रुग्णालयांपेक्षा वाजवी दरात होणारे उपचार, येथील स्वच्छता व टापटीपपणा, आपुलकीची पण विनम्र सेवा, प्रत्येक ठिकाणी असणारी शिस्त तसेच मा. श्री. भिडेसाहेब व मा. श्री. लिमयेसाहेब यांनी अचानक स्वतः वैयक्तिकरीत्या येऊन रुग्णाची विचारपूस करून सेवासुविधांबाबत विचारणा केली. अशा प्रकारची सेवा आमच्या दृष्टीने अत्यंत नवीन आहे. आपल्या सर्व प्रकारच्या सेवा आम्हाला खूप खूप आवडल्यात.

तरी भविष्यात आपल्याकडील सर्व रुग्णांना उत्तरोत्तर चांगल्या सुविधा मिळोत असेच आपल्याकडील टीमवर्क उत्तरोत्तर काळात अधिक जोमाने वाढो सर्व टीमना प्रणाम!

**- श्री. सुधीर सुपेकर**




# पुस्तक परिचय

# द लॉज ऑफ मेडिसिन

## डॉ. सिद्धार्थ मुखर्जी

सौ. चित्रा नित्सुरे

गेल्या काही दशकांत आधुनिक वैद्यकशास्त्रात विलक्षण गतीने स्थित्यंतरं झालेली आपण बघतोय. रोग निदान चाचण्यांत आणि उपचार पद्धतीत तंत्रज्ञानाचा सहभाग वाढतोय, मानवी शरीराचा जनुकीय आराखडा हाताशी असल्यामुळे रोगाचा शिरकाव, त्याचा शरीरातील प्रवास, त्याचं उच्चाटन याकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदललाय. अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अगदी रेणवीय स्तरावर, पेशी पातळीवर उपचार करणं शक्य झालं आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमात ॲनाटॉमी, फिजियॉलॉजी, सेलबायोलॉजी, फार्माकोलॉजी, पॅथॉलॉजी या मूलभूत विषयांच्या जोडीला अनेक अभिनव विषय समाविष्ट होणं क्रमप्राप्तच आहे. उणीपुरी चार वर्ष हे सारे विषय प्रयासपूर्वक आत्मसात करून झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थी रुग्णसेवेसाठी उत्सुक झालेला असतो. आपल्याकडील माहितीचा हा ठेवा रुग्णांना व्याधीमुक्त करणारच असा दुर्दम्य आशावाद आणि जबर आत्मविश्वास या ज्ञानभारित तरुण डॉक्टराच्या देहबोलीतून प्रकट होत असतो. इंटर्नशिप, रेसिडन्सी आणि सुपर स्पेशालिटीची फेलोशिप असा या तीन टप्प्यांत मात्र ज्ञानसाठ्यातील उणीवांची प्रखर जाणीव त्याला अस्वस्थ करत जाते. आपल्या जवळील या माहितीचं करावं काय, हीच माहिती पुस्तकातून मिळाली नसल्याचा साक्षात्कार त्याला वारंवार होत राहतो. अर्जित ज्ञान निर्विवादपणे विश्वसनीय, निर्दोष, अचूक आहे यावर तो ठाम असला तरी रुग्णविभागात फेरी मारताना, रुग्णांशी संवाद साधताना जे प्रभावी ठरतं ते शहाणपण आपल्याकडे नाही याची खंत त्याचं मन कुरतडत रहाते. या शहाणपणाला समंजसपणाची चौकट आहे. पण पुस्तकी माहितीसारखं बंदिस्त नाही. ते व्यक्तिगणिक बदलत असतं. प्रत्येक डॉक्टरचं स्वतःचं असं निराळंच 'क्लिनिकल' शहाणपण असतं. उपचार करण्याची त्याची स्वतंत्र फिलॉसॉफी असते. ज्ञान आणि शहाणपणातली ही दरी बुजवणं, ती ओलांडून पार जाणं अशक्य आहे असा सल सतत टुपत राहतो. हिप्पोक्रेटिसने सांगितलेल्या रुग्णाप्रती वचनबद्धतेतील ''डू नो हार्म''ची जागा ''डू नथिंग''ने घेऊ नये याविषयी त्याला जागरुक रहावं लागतं. अशावेळी काही सूत्रं, मार्गदर्शक तत्वं हाताशी असावीत असं त्याला प्रकषा४ने वाटत जातं. डॉक्टरला परिपूर्ण करणाऱ्या ज्ञान आणि शहाणपण या दोन वर्तुळांना सांधणाऱ्या दुव्याचा तो नित्य शोध घेत राहतो. अखेर त्याचा त्यालाच तो गवसतो. मात्र या प्रवासात कालापव्यय होतो, हातून काही प्रमाद, चुका घडतात याची हळहळ मग मनभर उरते.

डॉ. सिद्धार्थ मुखर्जी (१९७०-), जन्माने दिल्लीवासी, कर्माने अमेरिकन वैद्यकतज्ज्ञ, जागतिक स्तराचे निष्णात कॅन्सरतज्ज्ञ, संशोधक, लेखक. ''एम्परर ऑफ ऑल मेलडीज - अ बायोग्राफी ऑफ कॅन्सर'' (२०१०) ''लॉज ऑफ मेडिसिन'' (२०१५), ''द जीन-ॲन इंटिमेट हिस्ट्री'' (२०१६) या पुस्तकांद्वारे जनसामान्यांत वैद्यक भान जागवणारा जागल्या. त्यांच्या पहिल्याच पुस्तकाने पुलित्झर पुरस्कार, गार्जियन फर्स्ट बुक अवॉर्ड तर पटकावलेच, शिवाय मानाचे अन्य सहा पुरस्कार पण त्याला लाभले. २०१४ साली भारत सरकारने ''पद्मश्री'' देऊन त्यांना सन्मानित केलं. इंटर्नशिप पर्व

सुरू झाल्यापासूनच अपुरेपणाचा भाव त्यांच्याही मनात मूळ धरू लागला होता. या काळात न्यूटनचे गतिविषयक तीन सिद्धांत त्यांच्या मनात घुमत असत.या सिद्धांतांनी भौतिकशास्त्राचा पाया भक्कम केला. सव्वातीनशेहून अधिक वर्ष लोटली तरी मुख्य साधन म्हणून अभ्यासक आणि संशोधक आजही हे सिध्दांत वापरतात. त्यात यत्किंचितही बदल करण्याची गरज भासत नाही इतके हे सिद्धांत सार्वकालिक आहेत. वैद्यकशास्त्रातही असे सिद्धांत असावेत, असं वाटतंय तर आपणच ते का शोधू नयेत? हा विचार मनात आला. या निमित्ताने डॉ. मुखर्जी यांनी केलेलं गंभीर चिंतन प्रथम व्यक्त झालं ''टेड टॉक शो''मध्ये पुढे ''टेड बुक्स'' मालिके अंतर्गत सायमन ॲण्ड श्यूस्टर या संस्थेने ''लॉज ऑफ मेडिसिन'' पुस्तक प्रकाशित केलं. पृष्ठसंख्या अवघी अठ्ठ्याहत्तर. एका बैठकीत वाचून संपवता येईल असं हे छोटंसं पुस्तक.

सिद्धांत म्हणजे सत्यवचन! या सत्याला आधार असतो, विशिष्ट परिवेशातील प्रायोगिक निरीक्षणांचा. ही निरीक्षणं निसर्गातील विशिष्ट घटनांचं सामान्यीकरण करू शकतात. भौतिकशास्त्रात अनेक सिद्धांतांची रेलचेल आढळते, रसायनशास्त्र सिद्धांतदृष्ट्या तसं अल्पसंख्यी, जीवशास्त्र कोणत्याच सिद्धांताच्या चौकटीत बंदिस्त नसलेलं. वैद्यकशास्त्राचा संबंध असतो. भिन्नप्रकृती व्यक्तींशी. वैद्यक-ज्ञाना इतकीच, माणूस आणि त्याचं शरीर वाचण्याची कला उत्तम अवगत असणं हे डॉक्टरच्या यशस्वीतेचं मर्म. मुळात आधुनिक वैद्यकशास्त्र हे साऱ्या विज्ञानशाखांतील शेंडेफळ, द यंगेस्ट सायन्स! अन्य विज्ञन शाखांत आढळणारा काटेकोरपणा, नेमकेपणा यात नाही. रुग्ण आणि रोगाविषयी उपलब्ध असलेल्या संदिग्ध, मोघम माहितीच्या बळावर परिपूर्ण निर्णय घेणं हे डॉक्टरांचं प्राक्तन असतं. जीवनशैली, वय, वंश, व्यवसाय, मानसिक अवस्था, ऋतु, आहार अशा अनंत घटकागणिक आजाराची लक्षणं बदलतात. विविध निदान चाचण्यांची विश्वासार्हता, उपयुक्तता व्यक्तिसापेक्ष निराळी असते. चांगला सुधारत असलेला रुग्ण अकस्मात दगावतो. रुग्णांच्या मृत्यूने हादरून न जाता कार्यक्षम राहण्याची स्थितप्रज्ञता अंगी बाणवावी लागते. मोठमोठ्या रुग्णालयांतील कारभार घड्याळाच्या काट्याप्रमाणे यंत्रवत सुरू असतो. सारी अवधानं सांभाळत, आपल्या दमणुकीचा विचारही न करता इंटर्न, रेसिडेन्ट किंवा फेलो डॉक्टरने फक्त रुग्णहितासाठी अहर्निश सेवारत असणं अपेक्षित असतं. अशा परिस्थितीत सार्वत्रिक आणि सार्वकालिक स्वरुपाच्या सिद्धांताचा आग्रह धरणं संयुक्तिक होणार नाही याचं भान डॉ. मुखर्जींना आहे. आपला अनुभव आठवीत, पूर्वसुरींच्या नोंदीची योग्य दखल घेत ते अखेर वैद्यकशास्त्राचे तीन सिद्धांत मांडतात. त्यांचा अनुभव, मनाच्या खोल कप्प्यात सुरू असलेलं त्यांचं अविरत चिंतन गोळीबंद स्वरुपात वाचकांपुढे उलगडत जातं. हे सिद्धांत मी माझ्यापुरते रचले आहेत, असं जरी डॉ. मुखर्जी सांगत असले तरी वैद्यकशास्त्राच्या विद्यार्थ्यांइतकेच सामान्य वाचकाला देखील ते समजतात, पटतात.

तीन स्वतंत्र प्रकरणात या तीन सिद्धांतांचा परामर्श घेतला आहे. पहिला सिद्धांत रोगनिदान प्रक्रियेत डॉक्टरांच्या अंतःप्रेरणेचं महत्त्व अधोरेखित करतो. रुग्णाची संपूर्ण माहिती नसल्यामुळे आवश्यक ती रोगनिदान चाचणी न सुचविल्याचे प्रसंग कधीतरी घडतात. वस्तुतः रोग निदान चाचणीची विश्वसार्हता, संख्याशास्त्रीय निकषांवर, तपासल्यावरच तिचा वापर केला जातो. तरीदेखील अशा चाचणीचे रिपोर्टस् चुकीचे असू शकतात. परिणामी रोग निदान आणि उपाय योजना पूर्ण फसतात. अशा प्रसंगी डॉक्टर जर संवेदनशील असला तर तो अनेक सूक्ष्म तपशील नोंदवून घेऊ शकतो आणि आपल्या अंतर्मनाचा कौल मानून काहीशा अतार्किक मार्गाने रुग्णाला आरोग्यदान देऊ शकतो.

अनेक शास्त्रज्ञ अधिक प्रभावी औषध, अधिक प्रभावी उपचार तंत्र यावर संशोधन करत असतात. रुग्ण या नवीन औषधाला कसा प्रतिसाद देतात हे प्रत्यक्ष रुग्णालयात तपासलं जातं. एखाद दुसरा अपवाद वगळता सातत्याने सकारात्मक परिणाम आढळले की त्या औषधाचा नियमित वापर सुरू होतो. जे रुग्ण

व्याधिमुक्त झाले नाहीत त्यांचा सर्वांना विसर पडतो. डॉ. मुखर्जींना मात्र विपरित प्रतिसाद देणारे रुग्ण अधिक महत्त्वाचे वाटतात. या रुग्णांवर औषधांचा सुयोग्य परिणाम का झाला नाही, या प्रश्नाचा वेध घेतला तर त्या रोगाविषयी आणि औषधाच्या सक्रियतेविषयी महत्त्वाची माहिती मिळते असा त्यांचा दावा आहे. अनेक उदाहरणं देऊन डॉ. मुखर्जी आपला दुसरा सिद्धांत मांडताना - सामान्य वर्तुळातील व्यक्ती पायंडा पाडू शकतात, पण परिघाबाहेरच्या व्यक्तीच त्याला सिद्धांत रूप देऊ शकतात.

प्रत्येक मानवाला निरामय जीवनाचा आनंद घेता यावा म्हणून वैद्यकशास्त्राचा उदय झाला. डॉ. मुखर्जींचा तिसरा सिद्धांत वैद्यक क्षेत्राच्या याच मानवी पैलूकडे अंगुलीनिर्देश करतो. या क्षेत्रात माणूसच माणसावर प्रयोग करीत असतो. अद्ययावत वैद्यकीय ज्ञान असलेला संशोधक आणि त्याच्या प्रयोगात सहभागी झालेले अजाण रुग्ण, दोन्ही गट निर्लेप होऊ शकत नाहीत. साहजिकच वैयक्तिक निवड, प्राधान्य यांचे इष्ट अनिष्ट परिणाम या संशोधनावर होतात. संशोधनाचे निष्कर्ष त्रुटीपूर्ण होतात. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी मानवी प्रवृत्तीचा हस्तक्षेप टाळणं केवळ अशक्य आहे. या क्षेत्रातील प्रयोगाची आखणी निर्दोष होण्यासाठी जेवढा म्हणून प्रयत्न करावा तेवढंच त्यात मानवी मर्जीचं प्रमाण वाढत जातं! हाच तिसरा सिद्धांत, सुबुद्ध डॉक्टर आपली नीरक्षीर विवेकबुध्दी जागी ठेवतो. आधुनिक संशोधनातील केवळ हितकारक तत्त्वच तो स्वीकारतो.

या तीन सिद्धांतांचा परिचय करून देणे एवढाच मर्यादित हेतू या पुस्तकाचा नाही. या चिंतनाच्या निमित्ताने डॉ. मुखर्जींमधील संवेदनशील, सजग माणसाचं दर्शन घडतं. ते वाचकाला डॉक्टरांच्या अदृश्य विश्वात डोकावण्याची संधी देतात. वैद्यकशास्त्राच्या प्रवासातील अनेक वळणवाटांचा परिचय करून देतात. क्रांतदर्शी कल्पना माडणांऱ्या कितीतरी डॉक्टरांशी, तत्वचिंतकांशी आपला परिचय होतो. उत्तम इंग्रजी भाषा, कथनाची रसाळ शैली हे तर डॉ. मुखर्जींच्या लेखणीने घेतलेला निवडक वेध वाचकाला समृद्ध करून जातो हे निश्चित.

## ❑ नूतन वैद्यकीय सेवा ❑

### हिस्टोपॅथॉलॉजी लॅब (Histopathology Lab)



आपल्या श्रीगुरुजी रुग्णालयात यापूर्वी पॅथॉलॉजी विभागात बायोप्सी व इतर गाठींचे निदान करण्यासाठी बाहेरुन प्रोसेस करावी लागत असे त्यात वेळेची अडचण येत असे. त्यामुळे तसेच रुग्णालयात कॅंसर निदानाचे कामही वाढत आहे. त्यामुळे आपल्या रुग्णालयातच हिस्टोपॅथॉलॉजी प्रोसेसिंग लॅब सुरू करवी असा निर्णय घेण्यात आला. महिन्द्रा सोना प्रा.लि. सोबत आपण गत तीन वर्षांपासून लॅबशी संबधीत कार्य करीत असल्यामुळे तसेच श्री.भूषण पटवर्धन, नाशिक प्लॉट इन्चार्ज व डॉ. मालपाठक यांच्या सहकार्याने कंपनीने या लॅबच्या मशिन्स साठी २० लाख रूपये देणगी स्वरुपात दिले आहेत. आता श्रीगुरुजी रुग्णालयात अद्यावत हिस्टोपॅथॉलॉजी प्रोसेसिंग युनिट सेवा कार्यरत आहे. नाशिक मध्ये अशा प्रकारची सेवा अपोलो हॉस्पिटल नंतर फक्त श्रीगुरुजी रुग्णालयातच उपलब्ध आहे.

# रुग्णानुभव

एक चांगले सेवाभावी रुग्णालय, उत्तम सेवा, तत्पर स्टाफ असे श्रीगुरुजी रुग्णालयाविषयी मी ऐकून होते. आमचे व्याही श्री. रवींद्र बेडेकर त्यांच्याबरोबर आम्हा उभयताना हे रुग्णालय पूर्ण पाहण्याचा योग आला आणि महत्त्वाचे म्हणजे रुग्णालय स्वच्छ व सोयींनी परिपूर्ण वाटले. पण मलाच ह्या उत्तम सेवेचा लाभ घ्यावा लागेल याची कल्पना नव्हती. झाले असे कि डिसेंबर २०१५ अखेरीस एक दिवस सकाळी माझ्या डाव्या हातातून प्रचंड कळा येऊन हात खूप दुखायला लागला. एका नामांकित दवाखान्यात गेले MRI काढला व स्लीप डिस्कचे निदान झाले. सहा-सात दिवस अॅडमिट होते, परंतु घरी आल्यावर फारशी सुधारणा नव्हतीच. म्हणून माझ्या मुलीने मला श्रीगुरुजी रुग्णालयात डॉ. राजेंद्र खैरे ह्यांना दाखवायला नेलं. डॉक्टरांनी तपासले आणि पाठीवर कोणतेतरी Points दाबले, प्रचंड वेदना झाल्या. पण नंतर रुग्णालयातून बाहेर पडताना जरा आराम वाटू लागला व आपण लवकर बरे होणार अशी खात्री वाटली.

डॉ. खैरे ह्यांच्या सांगण्यावरून दुसऱ्या दिवसापासूनच माझी फिजिओथेरपी सुरू झाली. डॉ. सोनाली खैरे ह्यांनीपण आत्मियतेने व उत्तमपणे माझ्याकडून ती करून घेतली. Miracles happen when you believe ह्या म्हणण्याप्रमाणेच जणू घडत गेले व जसजशी फिजिओथेरपी होत गेली तशी माझी तब्येतपण सुधारत गेली. आता प्रकृती पुष्कळ बरी आहे आणि ह्याचे श्रेय मी डॉ. राजेंद्र खैरे व डॉ. सोनाली खैरे ह्यांना देते, कारण डॉ. खैरे ह्यांची Treatment आणि डॉ. सौ. खैरे ह्यांची फिजिओथेरपी ह्यांचा मला चांगलाच उपयोग झाला.

अजून एका डॉक्टरांचा मला नक्कीच उल्लेख करायला हवा आणि ते म्हणजे डॉ. गिरीश बेंद्रे यांचा. माझ्या मिस्टरांना कॅन्सर झालेला होता व एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते. परंतु वेळोवेळी डॉ. बेंद्रे ह्यांनीपण आमच्या कुटुंबाला योग्य मार्गदर्शन केले.

अशा या प्रतिष्ठित व सेवाभावी श्रीगुरुजी रुग्णालयाचा लाभ सर्व थरातील लोक घेऊ शकतात. कारण रुग्णालयाची फी सर्वांना परवडणारी अशीच आहे. तसेच ज्यांच्यावर पेशंट विश्वास ठेवू शकेल अशी उदात्तभावी व सेवाव्रती सर्व तज्ञ मंडळी, नर्सेस, मावशी व सर्व स्टाफ, सर्वजण उत्तमपणे कार्यरत आहेत.

अशीच श्रीगुरुजी रुग्णालयाची प्रगती अजून उत्तमोत्तम होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. धन्यवाद...

**– श्रद्धा किरण कर्वे**

मो. ९८८१०८००२०


# काव्यमय मनोगत

**कै. जयंत त्रिंबक परांजपे यांच्या स्मृतीस**

'अभी ना जाओ छोडकर' असे
आर्जवेने विनवणाऱ्या माझ्या प्रियेस,
अजून मला खूप खूप जगायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
'मनोजीव'चं नव्या रुपातील आगमन
मला सुखावत होतं, खुणावत होतं
विवेकाशी संधान बांधणं चालूच होतं
नवं स्वप्न आकाराला येत होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
बबीचे खूप हट्ट पुरवायचे होते
माऊचे खूप लाड करायचे होते
नातींना मला खूप शिकवायचं होतं
माणूस म्हणून त्यांना घडवायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
चिनू, अभिरीला दागिन्यांनी मढवायचं होतं
हिरव्या चुड्यात त्यांना पहायचं होतं
कोकण रेल्वेने तुला केरळाला न्यायचं होतं
दिवाळीत सुंदर मंगळसूत्र गिफ्ट करायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
जितेंद्र, शौनक, राहूल, भीमसेन
सर्वांना मनमुराद ऐकायचं होतं
शंकर महादेवनला कानात साठवायचं होतं
'ऋतू हिरवा'मध्ये चिंब भिजायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
आमचे दोन्ही लाडके सालस राजकुमार
त्यांना स्वत:चे वाहन चालवतांना पहायचं होतं
खऱ्यांबरोबर काश्मीरला पाठवायचं होतं
अक्कलकोटला तर सर्वांनीच जायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
अखंड जिद्दीने, अथक परिश्रम करून
काडी काडी जमवून, पिलांसाठी उबदार
सोपा तयार करणारी माझी सखी
तिच्याशी दैव घात करेलसं वाटलं नव्हतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
'सारा प्यार तुम्हारा मैने बाँध लिया है आँचलमें'
असं सतत बजावत राहणारी माझी सखी आता
'सजल नयन नित धार बरसती' अशी सोडून
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
'सखी मंद झाल्या तारका' असं म्हणेपर्यंत
माझ्या आवडीचे, पथ्याचे एकसे एक पदार्थ
घेऊन हसतमुखाने तू अवतरलीस की
दिसलीस तू फुलले, ऋतू या भावनेनं
सगळ्या यातना आनंदाने सोशीत होतो गं!
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
तुला पूर्वीसारखे पडतांना पहायचं होतं
मी पूर्ण झाल्याचे सेलिब्रेशन करायचं होतं
डॉ. बेंद्रे, डॉ. दिनकर केळकर, डॉ. चाकूरकर
या सर्वांना आवर्जून आमंत्रण द्यायचं होतं
इतक्यात खरंच मला जायचं नव्हतं...
तुझी जबाबदारी कुणावरंच टाकणार नव्हतो
पण परतीचे सर्व मार्ग बंद झाले आहेत
त्यामुळे आता आहे फक्त क्षमा-याचना
सुहास्य तुझे मनास मोही आठवून
कधीही न परतण्यासाठी दूर जात आहे
त्याबद्दल अगणित वेळा सॉरी
सॉरी, सॉरी, सॉरी, सॉरी...

**- श्रीमती सुनंदा परांजपे**
मो. : ९८८१२६७०६८

# क्षण आनंदाचे...




◂ BSS Community College च्या पॅरामेडिकल कोर्सेस उद्घाटन प्रसंगी बोलताना कार्यवाह श्री. प्रविण बुरकुले



गणवेशात उपस्थित पॅरामेडिकल कोर्सेसचे विद्यार्थी ▸



स्थूलता तपासणी शिबिरात माहिती देतांना डॉ. जयश्री तोडकर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना श्री. म्हसराळे सर

**वाजवी दरात योग्य उपचार**

ह्या प्रकल्पासाठी दिलेली देणगी आयकर अधिनियम ८० जी व अधिनियम ३५ ए. सी. अंतर्गत आयकर सवलतीस पात्र आहे.
कृपया देणगीचा धनादेश अथवा डी. डी. श्रीगुरुजी रुग्णालय (८० जी करीता) किंवा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान (३५ ए. सी करीता) या नावाने काढावा.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित

**श्रीगुरुजी रुग्णालय, नाशिक**

आनंदवल्ली चौक, गंगापूर रोड, नाशिक– ४२२ ०१३.

दूरध्वनी – २३४२४०१, २३४३४०१

मो.: ८३८००११२८६

website : www.shrigurujirugnalaya.com


प्रिंटेड मॅटर – बुक–पोस्ट

प्रति,

______________________

______________________

______________________